# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**, पहिला माळा, बी विंग
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२-२५५६९१६, ई-मेल apccfnodal@mahaforest.gov.in


क्रमांक: कक्ष-१७/नोडल/आयडी-१२६३८/(२६)/ ९०९ /२०२२-२३
नागपूर ४४० ००१, दिनांक १३/०७/२०२२

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
कोल्हापूर

विषय:- Proposal for diversion of 49.00 ha of forest land under Section 2 (ii) of the Forest (Conservation) Act, 1980 for Laterite Mining & Road in favour of Shri. Bhairavnath Earthmovers & Co., Ghungur, Tal. Shahuwadi, District Kolhaur, Maharashtra State.

संदर्भ:- शासन, महसूल व वन विभाग, पत्र क्र. गौखनि-३८/०९२१/प्र.क्र.२३५/ख-२, दि.२९/०६/२०२२

विषयांकीत प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावरून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत प्रकल्प यंत्रणेस कळविणेसंबंधीची आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

13/7/22

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, पहिला मजला, मादाम काम मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-३२.
Email ID : dokh.rfd@maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र.०२२-२२०४८२४७

क्रमांक: गौखनि-३८/०९२१/प्र.क्र.२३५/ख-२ दिनांक: २९ जून, २०२२.

प्रति,

जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

विषय : **गौण खनिज — कोल्हापूर**

मौजे घुंगूर, ता. शाहूवाडी येथील गट नं. ६८५ मधील एकुण क्षेत्र ३०८.४७ हे. आर पैकी २४.०० हे. आर. व मौजे परखंदळे ता.शाहूवाडी येथील गट नं. ५७२ ते ५७५ मधील एकूण क्षेत्र ११९.७८ हे.आर क्षेत्रापैकी २५.०० हे.आर असे एकूण ४९.०० हे.आर क्षेत्रावर लॅटराईट या खनिजाचा खनिपट्टा मंजूर करण्याबाबत.

- श्री. भैरवनाथ अर्थमूर्व्हस अॅन्ड कं.

संदर्भ:१. म.व व.वि.,शा.प.क्र.गौखनि-१०/०६२०/प्र.क्र.१४७/ख-२,दि. ०७.१२.२०२०.
२. आपले पत्र क्र. कार्या/ ६अ/आरआर/१७९१/२०१९, दि. ०५.१२.२०१९

उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र. २ अन्वये मौजे घुंगूर, ता. शाहूवाडी येथील गट नं. ६८५ मधील एकुण क्षेत्र ३०८.४७ हे. आर पैकी २४.०० हे. आर. व मौजे परखंदळे, ता. शाहूवाडी येथील गट.नं.५७२ ते ५७५ मधील एकूण क्षेत्र ११९.०७८ हे.आर क्षेत्रापैकी २५.०० हे.आर असे एकूण ४९.०० हे.आर क्षेत्रावर लॅटराईट या गौण खनिजाच्या खनिपट्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

२. याबाबत मला आपणास असे कळविण्याचे निदेश आहेत की, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम १८ मधील तरतूद तसेच संदर्भाकित अ. क्र. १ येथील शासन परिपत्रक दिनांक ०७.१२.२०२० मधील तरतूदी नुसार मौजे घुंगूर, ता. शाहूवाडी येथील गट नं. ६८५ मधील एकुण क्षेत्र ३०८.४७ हे. आर पैकी २४.०० हे. आर. व मौजे परखंदळे, ता. शाहूवाडी येथील गट.नं.५७२ ते ५७५ मधील एकूण क्षेत्र ११९.०७८ हे.आर क्षेत्रापैकी २५.०० हे.आर असे एकूण ४९.०० हे.आर क्षेत्रावर लॅटराईट या गौण खनिजाचा खनिपट्टा खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) सदर खाणपट्टास भारत सरकार, केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांची अंतिम मान्यता (Stage — I & II Forest Clearance) प्राप्त असणे आवश्यक आहे.

२) सदर खाणपट्याचा १० वर्षाचा कालावधी निष्पादनानंतर १० वर्षे इतक्या कालावधीसाठी असेल. सदर खाणपट्यास ०७ वर्षे करीता पर्यावरण अनुमती देण्यात आलेली आहे. उर्वरित कालावधीकरिता खाणपट्टाधारकास पर्यावरण अनुमती प्राप्त करून घेण्यास सांगावे अन्यथा सदर खाणपट्टा पर्यावरण अनुमती नसलेल्या कालावधीकरिता रद्द करण्यात यावा.

३) सदर खाणपट्टाधारकांना करारनाम्यातील तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.



Scanned by TapScanner

४) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ११(५) मध्ये नमूद केल्यानुसार खाणपट्टाधारकाकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी करून घ्यावी.

५) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम तसेच भारत सरकार, केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी (Stage – I Forest Clearance) आणि (Stage – II Forest Clearance) मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती व करारनाम्यातील कोणत्याही तरतुदीचा भंग केल्यास मंजूर करण्यात केलेला खाणपट्टा संपुष्टात आणण्यात येईल.

६) सदर खाणपट्ट्याच्या मंजुरीच्या अनुषंगाने आदेश पारित करणे/करारनामा करणे, विहित कालमर्यादेत खाणपट्टा निष्पादन करणे इ. बाबींची पूर्तता जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी करावी.

७) कोणत्याही परिस्थितीत नियमातील तरतुदी तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय खाणपट्टाचे निष्पादन करण्यात येऊ नये.

(स.गो.मोहिते)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत-

संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, जुन सचिवालय ईमारत, नागपूर.



Scanned by TapScanner